मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक १० • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर - २०१८



// # हसती दुनिया (मराठी)

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

अंक १० • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर २०१८

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर


संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९




## कथा


- कथा हनुमंताची ०६
- कष्टाचे बळ, मिळते फळ ०८
- प्रेमाची फुलबाग १४
- हुशार राजू ४२
- अनुभव ४८







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस ०५
- तेजस्विनी -७८ २०
- दुर्गभ्रमंती २२
- अहमदहन २९
- आपले जिल्हे - पुणे ३०
- समर्थ दर्शन -४८ ३४
- वाचन प्रेरणा दिवस ४१
- स्टॅच्यु ऑफ लिबर्टी ४४
- पक्षीजगत ४७









## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६


## कविता


- दहन रावण पुतळ्याचे २१
- अजब नगरी ४५

# संघर्षाची गरज

माणसाला सर्व गोष्टी न मागताच मिळत गेल्या की त्याला त्या गोष्टींचे महत्त्व वाटत नाही; पण तेच संघर्ष करुन मिळवलेल्या गोष्टी त्याला महत्त्वपूर्ण तर वाटतातच; पण त्या कायमस्वरुपी टिकाऊ देखील ठरतात. एकदा एक शेतकरी देवावर अतिशय नाराज झाला. कधी अतिवृष्टी व्हायची, पूर यायचा तर कधी दुष्काळ पडायचा, कधी गारपीट होऊन त्याच्या पिकाचे काही ना काही नुकसान व्हायचे.

एके दिवशी त्रासून तो देवाला म्हणाला, देवा! तू सर्वशक्तिमान आहेस, पण असं वाटतं की, तुला शेतीवाडीतील जास्त काही कळत नाही. माझी एक विनंती आहे की, मला एक वर्ष संधी दे. मी म्हणेल तसं हवामान ठेव. मग बघ कसं पीक घेतो.

देव हसला आणि म्हणाला, ठीक आहे. जसे तुला हवे तसे हवामान ठेवेन. त्यात मी अजिबात ढवळाढवळ करणार नाही. शेतकऱ्याने गहू पेरले. जेव्हा थंडी हवी होती तेव्हा थंडी, पाणी हवे असेल तेव्हा पाणी मिळण्याची, हवे तेव्हा ऊन मिळण्याची व्यवस्था देवाने केली. हळूहळू गहू चांगला ऊभारी धरु लागला. शेतकरी खूश होता. असे पीक कधीही आले नव्हते. शेतकरी मनातल्या मनात विचार करत होता, आता देवाला समजेल की पीक कसे घेतात? उगाचच इतकी वर्षे आम्हा शेतकऱ्यांची परीक्षा घेत होता. जेव्हा सुगीचे दिवस आले तेव्हा शेतकरी मोठ्या खुशीत कापणी करायला गेला. पण कापणी करुन मळणीची वेळ आली तेव्हा लोंबीत दाणेच दिसेनात. तो एकदम निराश झाला.

सगळ्या लोंब्या रिकाम्याच होत्या. त्यात गहू नव्हताच. दुःखी मनाने तो देवाला म्हणू लागला, देवा! हे काय केलंस? त्यावर देव म्हणाला, 'हे तर घडणारच होतं. तू त्या गव्हाच्या रोपांना थोडासुध्दा संघर्ष करण्याची संधी दिली नाहीस. ना तीव्र उन्हाच्या झळा लागू दिसल्या, ना वादळ, गारांचा मारा सहन करण्याची संधी दिलीस. त्याला कुठल्याच आव्हांनांचा सामना करु दिला नाहीस. त्यामुळे या लोंब्या सगळ्या पोकळच राहिल्या. त्यात गहू भरलाच नाही. जेव्हा वादळ वारा येतो, मुसळधार पाऊस पडतो, गारा पडतात तेव्हा पीक स्वतःच्या ताकदीवर ऊभे राहते. ते स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करते. या संघर्षातून जी शक्ती निर्माण होते ती त्याला ताकद देते.'

सोन्याचा दागिना घडवण्यासाठी सोन्याला देखील आगीत तापवावे लागते. हातोड्याचा मार सहन करावा लागतो. त्यातूनच मग सोन्यामधील सौंदर्याला झळाळी प्राप्त होते. अशाच प्रकारे आयुष्यातील आव्हाने स्वीकारावीच लागतात. अन्यथा आपलेही व्यक्तिमत्त्व आतून पोकळच राहील. जर आयुष्यात प्रभावी आणि बुध्दिमान बनायचे असेल तर संघर्ष आणि आव्हानांचा सामना करावाच लागतो.

- राजेंद्र थोरात..



# आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस




२ ऑक्टोबर हा महात्मा गांधी जयंती दिवस. दुधात साखर म्हणजे हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून पाळला जाणे भारताच्या दृष्टीने निश्चितच गौरवास्पद आहे. युनो या संघटनेने आजपर्यंत घोषित केलेल्या दिवसांपैकी एखादा दिवस एखाद्या व्यक्तीच्या जयंती किंवा पुण्यतिथी निमित्ताने जाहीर झालेला अभावानेच आढळेल. अर्थात हा मान भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना मिळाला आहे. सर्वच धर्मांनी अहिंसेला श्रेष्ठ मानलं आहे. महात्मा गांधीजी स्वत: म्हणत, की सत्य आणि अहिंसा ही तत्त्व हिमालयाइतकी प्राचीन आहेत. मग महात्मा गांधीजींचा जन्मदिवस अहिंसा दिवस म्हणून साजरा करण्याचे औचित्य कोणते? अहिंसेचे तत्व धार्मिक क्षेत्रात, वैयक्तिक जीवनापुरतं मर्यादित होतं. महात्मा गांधीजींचं वेगळंपण असं, की त्यांनी अहिंसेचं तत्त्व राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अन्याय निवारण्याचं साधन म्हणून जगासमोर ठेवलं. त्याला सामाजिक रुप देऊन त्याचा आफ्रिकेत आणि भारतात यशस्वी वापर केला. शोषित-पीडित साधनहीनांच्या हातात अहिंसक सत्याग्रहाचं एक अभिनव शस्त्र दिलं. अहिंसक सत्याग्रहाच्या शस्त्राने गुलामीच्या शृंखला तुटू शकतील अशी कल्पनाही जगात केली नव्हती, पण महात्मा गांधीजींनी नुसती कल्पना केली नाही तर प्रत्यक्षात ती साकार केली.

महात्मा गांधीजींनी अहिंसेचं मूलगामी चिंतन केलं आहे. त्यांनी प्रत्येक लढ्याच्या वेळी अहिंसक मार्गाचं स्पष्टीकरण हरिजन आणि यंग इंडिया या नियतकालिकांमधून केलं. अहिंसा दिनाच्या निमित्ताने गांधीजींना अभिप्रेत असलेला अहिंसेचा अर्थ समजून घेतला पाहिजे. महात्मा गांधीजींनी म्हटलं, अहिंसक मार्ग हा अत्यंत बिकट आहे, तिथे भ्याडपणाला स्थान नाही. ती शूर-वीरांची अहिंसा आहे.

महात्मा गांधीजी हे अहिंसेचे निर्भय सेनानी होते आणि त्यांची निर्भयता अनेक वेळा दिसून आली.

उर्वरीत पान क्र.०९ वर

पौराणिक कथा



# कथा हनुमंताची

महाबली वीर हनुमंताचे समुद्रलंघन, लंका दहन या अलौकिक पराक्रमाचे साक्षी स्वत: प्रभू रामचंद्र होते; परंतु हनुमंताच्या पूर्वचरित्रकहाणीविषयी फारशी जाणकारी श्रीरामांना नव्हती .श्रीरामांनी ती जाणून घेण्याची इच्छा अगस्त ऋषीपुढे प्रगट केली.अगस्त ऋषी सांगू लागले, "हनुमान हा अंजनीचा पुत्र. अंजनीचा पती केसरी असला तरी पवनदेवापासून तिला झालेला हा पुत्र असल्यामुळे तो पवनपुत्र म्हणूनही ओळखला जातो. असं म्हणतात, की बाळपणी हनुमानाला भूक लागली होती.उगवत्या सूर्याला लाल फळ समजून बाल हनुमान त्याकडे झेपावला. राहू केतू तेव्हा सूर्याला ग्रासू पाहत होते, परंतु मध्येच हनुमानाचे आगमन झाले. त्यामुळे राहू घाबरुन पळत सुटला तो थेट इंद्राकडे. इंद्रासमोर त्याने गाऱ्हाणे मांडले. इंद्र ऐरावतावर बसून हनुमानाचा समाचार घेण्यासाठी निघाला. ऐरावत हत्ती म्हणजे कुणी फळच आहे, अशा समजुतीने बालहनुमान ऐरावताकडे धावला. इंद्राने हनुमानावर वज्राचा प्रहार केला. त्यामुळे हनुमानाची हनुवटी तुटली व बालहनुमान खाली कोसळला. आपल्या पुत्राची ही अवस्था पाहून पवनदेवाला क्रोध आला. त्याने आपले सारे चलन वलन थांबवले.



वायुशिवाय जगाची अवस्था कासावीस झाली. वायू हेच जगाचे जीवन आहे.रुष्ट झलेला पवनदेव आपल्या मृत पुत्राला घेऊन ब्रह्मदेवापाशी आला. ब्रह्मदेवाने हळूवारपणे आपला हात त्या बालकावरुन फिरवला. त्याबरोबर बालहनुमानात पुन्हा चैतन्य जागे झाले. आपला पुत्र जिवंत झाल्याचे पाहून वायूने पन्हा आपले चलन वलन व्यवहार यांना सुरुवात केली. पवनदेवाला अधिक प्रसन्न ठेवण्यासाठी आणि या तेजस्वी बालकासाठी सर्व देवांनी त्याला वरदान द्यावे, असे आवाहन ब्रह्मदेवाने केले. तेव्हा सहस्त्र नेत्रधारी इंद्र पुढे झाला. त्याने बालकाला वर दिला.

"माझ्या हातून सुटलेल्या वज्रामुळे या बालकाची हनुवटी तुटली म्हणून या कपिश्रेष्ठाचे नाव 'हनुमान' पडेल, शिवाय यापुढे वज्रानेदेखील हा मारला जाणार नाही."

भगवान सूर्यनारायण म्हणाले, "मी याला तेज देत आहे.तसेच शास्त्राचे ज्ञान देत आहे. तो शास्त्रांचा उत्तम जाणकार -दार्शनिक व उत्तम वक्ता होईल!"

वरुण म्हणाला, "माझ्या जलपाशाने याला कधीही मृत्यू येणार नाही!" यमदेव म्हणाला, "माझ्या यमदंडाची मात्रा याच्यावर चालणार नाही." एकाक्ष कुबेर म्हणाला, "माझ्या गदेने संग्रामात याचा कधीही वध होऊ शकणार नाही.तसेच युध्दात हा कधी थकणार नाही." भगवान शंकर म्हणाले, "हा माझ्याकडून किंवा माझ्या आयुधांनी कधी मारला जाणार नाही." विश्वकर्मा म्हणाला, "हा बालहनुमान चिरंजीव होईल." ब्रह्मदेव म्हणाले, "ब्रह्मदंडापासून हा अवध्य राहील!"


शेवटी ब्रह्मदेव वायूला म्हणाले,

"मारुता, तुझा हा पुत्र मारुती. शत्रूसाठी भयंकर व मित्रासाठी अभयदाता असेल. युद्धात याला कुणी जिंकू शकणार नाही. इच्छेनुसार हा रुप धारण करुन कुठेही जाऊ शकेल. श्रीरामांचा हा निष्ठावंत व प्रिय अनुचर असेल. अशाप्रकारे देवांकडून अनेक वरांची प्राप्ती झालेला बालहनुमान मग वायुदेवाने माता अंजनीच्या हाती सुपूर्द केला. अनेक वर प्राप्त झाल्यामुळे बलदंड झालेला बालक हनुमान ऋषींच्या आश्रमात जाऊन अनेक नसते उपद्व्याप करु लागला. तोड-फोड व विध्वंस करु लागला. तेव्हा संतापलेल्या ऋषींनी त्या बालकाला शाप दिला,

"बालक वानरा, तुला तुझ्या बलाचं विस्मरण होईल. पुढे यथाकाल तुझ्या स्वरुपाचं व कीर्तीचं स्मरण करुन दिल्यावर, तुला पुन्हा हे बल प्राप्त होईल." महर्षींच्या या शापाने बालक हनुमानाचे तेज व बल घटले. तो मृदू स्वभावी होऊन आश्रमात हिंडू लागला.

पुढे सुग्रीवावर जेव्हा विपत्ती आली आणि वाली व सुग्रीव यांच्यात संग्राम उभा राहिला, तेव्हा तरुणवयात पदार्पण केलेला हनुमंत नुसता मुखस्तंभासारखा पाहत उभा राहिला. कारण आपल्या बलाचे त्याला ऋषींच्या शापामुळे विस्मरण झाले होते. हनुमानाची कीर्ती सांगितल्यावर अगस्त्यमुनींनी श्रीरामांचा निरोप घेतला. "अनुष्ठानासाठी व त्या - निमित्ताने ऋषी - मुनींनी माझ्याकडे पुनः पुन्हा यावे." असे आग्रहाचे निमंत्रण देऊन मग श्रीरामांनीदेखील अगस्त्यांसह सर्व ऋषी - मुनींचा निरोप घेतला.

❍ क्रमशः



कथा : अनुप साळगावकर (दादर)

# कष्टाचे बळ, मिळते फळ

एक आटपाट नगर होतं. त्या नगराचं नाव स्वप्ननगरी. या स्वप्ननगरीवर राज्य करत होता राजा स्वप्नील आणि त्या राजाची लाडकी राजकन्या स्वप्नाली. या नगरात अनेक स्वप्न वास्तव्याला होती. काही शूर, काही शांत, काही हसरी, काही रडवी, काही चांगली, काही वाईट काही स्वप्न झोपेत हळूच खुदकन हसवणारी काही दचकून जागं करणारी. चॉकलेटपासून खेळण्यापर्यंत सगळे हट्ट पुरवायची. जिथे जायची इच्छा आहे तिथे फिरायला न्यायची. जे हवंय ते मिळाल्यावर चेहऱ्यावर एक समाधानाचा आनंद द्यायची. राजकन्या या सगळ्या स्वप्नसुखापासून वंचित होती. राजकन्येला स्वप्नच पडायची नाहीत. कारण मुळात तिला शांत झोपच यायची नाही. राजमहालात तिच्या दमतीला सतत तिच्यासोबत नोकर-चाकर असत. सगळ्याच गोष्टी हातात मिळत गेल्यामुळे तिचा स्वभाव आळशी बनला, तिने कधीही कोणतंच काम केलं नाही, की इकडची काडी तिकडे केली नाही.

थोडी मोठी झाल्यावर राजाने राजकन्येला ज्ञान

प्राप्त करण्यासाठी राजगुरुंना आमंत्रण दिलं. राजगुरुंना राजकन्येच्या या आळशी स्वभावाबद्दल चांगलीच माहिती होती. त्यावर उपाय म्हणून त्यांनी ते आमंत्रण न स्वीकारता राजकन्येलाच गुरुकुलात येऊन राहावं लागेल अशी अट घातली. राजगुरुंची अट मान्य करण्यावाचून काहीच पर्याय नसल्यामुळे त्याला राजकन्येला राजमहालापासून दूर पाठवणं भाग पडलं. गुरुकुलाची दिनचर्या ठरलेली होती. त्यामुळे तिथे स्वत:ला बदलणं राजकन्येला खूप कठीण गेलं.

गुरुकुलामध्ये तिला सकाळी लवकर उठावं लागे. झाडलोट, सडा सारवणं, प्राण्यांची निगा राखणं, झाडांना पाणी देणं, स्वयंपाकात मदत करणं अशी अनेक कामे आटपेपर्यंत रात्र व्हायची आणि राजकन्या दमून जायची. दिवसभर शीण आल्याने रात्री एका छोट्याशा चटईवरही तिला शांत झोप लागायची.

राजकन्या झोपल्यावर स्वप्न हळूवार तिच्या अंर्तमनात शिरायची, तिला खूप हसवायची, स्वप्नसुखांचा आनंद द्यायची. झोप पूर्ण झाल्याने राजकन्येची गुरुकुलात दररोज सुंदर आणि उत्साही सकाळ व्हायची.

हळूहळू राजकन्येला कष्टाचं महत्त्व पटलं. गुरुकुल संपवून राजमहालात आल्यावर राजकन्या सगळी कामं स्वत:ची स्वत: करायची आणि सुंदर स्वप्नांची वाट पाहत शांत झोपी जायची. राजाने राजकन्येच्या आळशी स्वभावावर उपाय शोधून काढल्यामुळे राजगुरुंचे आभार मानले आणि काही वर्षाने लाडक्या राजकन्येचं एका राजकुमाराशी लग्न लावून दिलं. मित्रहो, स्वत:ची कामं स्वत:च करा, शांत झोपा, सुंदर स्वप्न पाहा. कारण आपली स्वप्नं आपल्या आयुष्याला योग्य दिशा देतात.

❑❑❑


पान क्र. ०५ वरुन

महात्मा गांधीजी म्हणत, प्रत्यक्ष हत्या न करणे म्हणजे केवळ अहिंसा नव्हे. प्रत्येक कुविचार, उतावळेपणा, मिथ्या भाषण, एखाद्याचे वाईट चिंतणे ही देखील हिंसाच आहे. इतरांना ज्या वस्तू गरजेच्या आहेत, त्या वस्तू आपल्या लोभ-मोहापायी स्वत:च्या ताब्यात ठेवणे हीसुध्दा हिंसाच आहे. अहिंसा म्हणजे आक्रमकाच्या हिंसेपुढे वाकणे नव्हे, तर जरी मरण आलं तरी त्याच्या अन्यायापुढे न झुकणं हा अहिंसेच खरा अर्थ आहे. हिंसक मार्गात प्रतिपक्षाला क्लेश देणं बसत नाही. इथे गरज आहे आत्मक्लेशाची आणि त्यासाठी पाहिजे आत्मबळ. प्रतिपक्षाचं हृदय परिवर्तन हा अहिंसक सत्याग्रहाचा हेतू असतो.

१९४२ चा लढा सुरु करण्यापूर्वी महात्मा गांधीजी म्हणाले होते, अहिंसक आंदोलनाचा हेतू ब्रिटिशांकडून सत्ता हिसकावून घेणं हा नसून हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या परस्पर संबंधात परिवर्तन घडवून शांततापूर्ण सत्तांतर हे आहे. याचा प्रत्यय भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर आला. दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. सत्तांतर शांततेने संपन्न झालं.

आज अहिंसेचं इतकं सूक्ष्म विवेचन करणारा महात्मा तर नाहीच शिवाय या अहिंसेच्या अभिनव मार्गावरुन आपल्याला बोट धरुन चालवणारा राष्ट्रपिताही आज दिसत नाही. म्हणूनच आज महात्मा गांधीजींच्या विचारातून आणि शिकवणीतून मार्गदर्शन घेऊन आपणच आपल्याला घडवायचं आहे. खऱ्या अर्थाने माणूस बनायचं आहे. असं झालं तरच जग नष्ट करायला निघालेल्या हिंसेचं तांडव थांबणार आहे आणि मानवी जीवन सुरक्षित होणार आहे.


❑❑❑



# शब्दकोडे

## १७१

○ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )



## आडवे शब्द

२. महाभारताच्या युध्दाचं प्रत्यक्ष वर्णन धृतराष्ट्राला कोणी कथन केले ?

४. 'राष्ट्रसंत' ही उपाधी कोणाला दिलेली आहे ?

५. धरती, धरा, पृथ्वी

७. डेसीबल ही संज्ञा कशाशी संबंधित आहे ?

८. पहिला मराठी बोलपट : अयोध्येचा ......

९. भगवान श्रीकृष्णाचा मामा

१२ ..... लिंकन अमेरिकेचे १६ वे राष्ट्रपती होते.

१४. पत्नी या शब्दाचा समानार्थी शब्द

१५. वर्गात शिकविणाऱ्या शिक्षिका

१६. पाकिस्तानातील एक शहर

## उभे शब्द

१. आंतरराष्ट्रीय वृध्द दिन ऑक्टोबर महिन्याच्या .... तारखेला साजरा करतात.

२. ..... बुटी प्राप्त करण्यासाठी हनुमंताने पर्वतच उचलून आणला होता.

३. महात्मा गौतम बुध्दांच्या पत्नीचे नाव

४. रेशमाचे किडे कोणत्या झाडावर पोसले जातात ?

६. शिवरायांचे एक सुपुत्र

१०. संभाजी राजांची आई

११. शरीरावर काळे पट्टे असणाऱ्या प्राण्याचे नाव

१२. नरनाळा आणि अकोट हे किल्ले या जिल्ह्यात आहेत.

१३. एक किलोग्रॅम म्हणजे ........ ग्रॅम

उत्तरे इतरत्र



# दादाला विचारु या

**प्रश्न : सर्वात चांगला संकल्प कोणता ?**

**उत्तर :** अज्ञान-भ्रम यातून मुक्त होणं हा सर्वात चांगला व शुभ संकल्प आहे. 'मी कोण आहे ?' माझं खरं स्वरुप काय आहे हे जाणून घेणं यालाच ईश्वरप्राप्ती म्हणतात. यासाठीच ब्रह्मबोध प्राप्त करणे आवश्यक आहे.

**प्रश्न : सर्वात दुर्लभ देह कोणत्या प्राण्याचा आहे ?**

**उत्तर :** मनुष्यदेह प्राप्त होणं हे सर्वात भाग्याचं असून अत्यंत दुर्लभ आहे. कारण ईश्वरप्राप्ती केवळ मनुष्यदेहात असतानाच होऊ शकते. इतर प्राण्यांना आणि देवीदेवतांनाही ते अप्राप्य आहे. म्हणून मनुष्य देह सर्वात दुर्लभ आहे.

**प्रश्न : सर्वात मोठं दु:ख कोणतं ?**

**उत्तर :** दारिद्र्य हे सर्वात मोठं दु:ख आहे. दारिद्र्य म्हणजे धनाचा अभाव असणे असे नाही, तर भावनेचा आणि ब्रह्मज्ञानाचा अभाव असणे म्हणजे दारिद्र्य. ईश्वरीय ज्ञानाचा बोध नसलेला मनुष्य संकुचित वृत्तीचा असतो तो केवळ आपल्या स्वत:च्या इच्छा-कामनांच्या पूर्तीसाठी परमात्म्याकडे सतत मागत असतो. अशी दारिद्र्यता आणि कंगालता असणं हेच सर्वात मोठं दु:ख आहे.

**प्रश्न : सर्वात श्रेष्ठ सुख कोणतं ?**

**उत्तर :** 'संत मिलन सम सुख जग नाही' या संत वचनाप्रमाणे संतांच्या भेटीसारखं श्रेष्ठ सुख जागात कुठेही लाभत नाही. संतांच्या भेटीने अज्ञान नष्ट होते. चिंता मिटून जाते. संत सांसारिक गोष्टींची ना चर्चा करतात, ना त्याच्याशी जोडतात. ते तर सत्-चित्-आनंदस्वरुप परमात्म्याशी जोडण्याचं काम करतात. त्रिविध ताप दूर करुन जीवावरचा जन्मोजन्मीचा भार उतरवतात. यासाठीच म्हटलं आहे -

संत आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ। नाना संतोषाचे मूळ। ते संत।।

विचारपुष्प



# समर्पण आणि सत्वचन

समर्पण आणि सत्वचनाच्या भावनेने शहनशाहजीवालं युग आणलं जाऊ शकतं. आजच्या दिवशी युगपुरुष बाबा अवतारसिंहजी तसेच जगतमाता बुध्दवंतीजी सहित त्या तमाम महात्म्यांच्या तप-त्यागाची आठवण केली जात आहे; ज्यांनी सत्याचा संदेश जनमाणसापर्यंत पोचवण्यासाठी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केलं

आज चार वाजेपर्यंतच सत्संगाची घोषणा केली होती, आता पाच वाजले आहेत. कमीतकमी वेळ घेईन. कारण तुमच्या सर्वांचा वेळ किंमती आहे. आजच्या दिवशी शहनशाहजी आणि त्या

सर्व संताना नमन करत आहोत, आपण सर्व हीच प्रार्थना करुया की, निरंकाराला आपल्या प्रिय भक्तांच्या आत जे गुण अपेक्षित आहेत ते धारण करुया, कारण तेच भक्त सद्‌गुरुला प्रिय आहेत. आता आपण डॉक्युमेंट्री फिल्म बघितली की, पहिल्यांदा शहनशाहजी, जगतमाताजींच्या नावाने हा दिवस साजरा होत होता. नंतर जेव्हा प्रधान लाभसिंहजींनी शरीर सोडलं तेव्हा या दिवसाला 'मुक्तीपर्व' असं नाव दिलं गेलं. मुक्ती पर्व हे नाव सद्‌गुरुने तेव्हा दिले जेव्हा एक श्रध्दाळू भक्त त्या शृंखलेत सहभागी झाला, मग तेव्हा सद्‌गुरुने स्वत:च्या माता-पित्यांचा विचार केला नाही.

म्हणून हीच प्रार्थना करते की, ज्याप्रमाणे बाबा हरदेवसिंहजी आणि माता सविंदरजींना अपेक्षित होतं, स्वत: त्यांच्या शुभवाणीचं वचन होतं की, शहनशाहजींचं युग परत यावं, मग ते युग कसं येईल ? बाबाजी आणि माताजींनी हेच समजावलं की, समर्पण, सत्वचन आणि एक-दुसऱ्याला भोग लावत, एक-दुसऱ्याला प्राधान्य देत, एक-दुसऱ्याच्या चरणी आपल्या 'मी' ला आपल्या अहंकाराला संपवायचे आहे. जसं, एक उदाहरण आहे की, पाण्यात एक नाव चालत आहे आणि वारा खूप जोरात वाहात आहे तर आपण वाऱ्याला नियंत्रणात ठेवू शकत नाही, पण आपल्या नियमानुसार जी दिशा मिळाली आहे त्या दिशेवरच चालायचे आहे, याकरता नावेच्या शिडेला असलेल्या कपड्याला अनुकूल करुन त्या नावेला योग्य दिशेत ठेवता येतं. आता आपण किती आहोत, ज्यांनी आपल्या डोळ्यांनी शहनशाहवालं युग त्या वेळेला पाहिलं ? पण आता आपण हे युग आणण्यासाठी हेच करायचं आहे की, सर्वांनी निरंतर समर्पण करायचं आहे, तरच त्या-त्या वेळेच्या ज्या गोष्टी आहेत त्या या युगातही अमलात येऊ शकतात, फक्त फरक इतकाच आहे की, त्या वेळी त्या भक्तांनी समर्पण केलं तसंच संपूर्ण समर्पण आताही करता यावं.

मागील सत्संगात आपण सद्‌गुरु माताजींच्या जीवनावर श्रध्दांजली रुपात प्रेरणा दिवस ठेवला होता, त्याच शृखंलेत दासी प्रार्थना करु इच्छिते की, ज्याप्रमाणे बाबाजी, माताजींना अपेक्षित होतं तसंच पुढे एक-एक भक्त आपलं जीवन त्याचप्रमाणे व्यतीत करो, मग आपण कुठल्याही परिस्थितीत असो, त्याच दिशेने पुढे-पुढे जात राहू.'

❑❑❑

प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे आपआपसात मिळून बसावे, एक - दुसऱ्यांबरोबर प्रेम - नम्रतेने रहावे कारण परमात्म्याने सर्वांना मनुष्य बनवून पाठवले आहे. परमात्म्याने आम्हाला वेगवेगळ्या जाती - पातीच्या रुपात पाठविले नाही. जर परमात्म्याला तसे पाठवायचे असते तर कुठली ना कुठली तरी निशाणी लावून पाठविले असते. मग हे कळले असते की हा हिंदू आहे, हा मुसलमान आहे, हा सिख आहे, हा ईसाई आहे. परंतु परमात्म्याने आमची एकच जात बनवली आहे आणि ती आहे मानव! संत महात्मा मानव एकता स्थापित करतात, मानवाला मानवाबरोबर जोडतात, कधीही तोडत नाहीत.

-ममतामयी निरंकारी राजमाताजी





कथा : रंजना भांगरे (मुलुंड-मुंबई)

# प्रेमाची फुलबाग

रामू एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा होता. वयाच्या १२ व्या वर्षीच त्याचे आईवडील वारल्यामुळे तो त्या घरात एकटाच राहत असे. एकटाच असल्यामुळे त्याला शेती वगैरे करणे अवघड होते म्हणून तो आजूबाजूच्या लोकांकडे मोलमजूरी करुन आपली उपजीविका चालवत असे. रामू हसतमुख राहणारा आणि सर्वांशी गोड बोलणारा तसेच वडिलधाऱ्यांचा आदर सन्मान करणारा असल्यामुळे तो सर्वानाच आवडत असे. त्यामुळे आता तो एकटा असला तरी संध्याकाळी काम करुन आल्यानंतर त्याच्या घरी त्याची मित्र मंडळी त्याच्याकडे गप्पागोष्टी करायला यायची. अशाप्रकारे गावातील सर्वानाच तो प्रिय होता. त्यामुळे रामुचे हितचिंतकच सर्व असल्यामुळे काही जण रामूच्या लग्नाचा विचार करुन त्याचा संसार थाटून देण्याचा विचार करु लागले. एके दिवशी रामूला ही गोष्ट सांगून गावातीलच एक चागंली

मुलगी पाहून गावकऱ्यांनी त्याचे लग्न लावून दिले.

मुलगी व्यावहारिक असल्यामुळे तिलाही वाटत होते की आपणसुध्दा रामूला काही मदत करावी. म्हणून ती गावातीलच एका फुलबागवाल्याकडे फुले तोडण्याच्या कामासाठी राहिली. काही दिवस गेल्यानंतर तिच्या मनात असे विचार आले, की अरे हा तर सोपा व्यवसाय आहे आपणसुध्दां हा करु शकतो.

हळूहळू तिने रोप रुजवलं, वाढवणं,खतपाणी देणं याचा अभ्यास केला आणि काही दिवसातच आपणसुध्दा फुलबाग करायची असं रामूला तिने सांगितले. रामूसुध्दा तत्काळ तयार झाला. घराच्या असपास थोडी जमीन होती आणि विहीरही होती.

आता रामूने व रामूच्या पत्नीने फुलांची रोपे तयार केली. काही दिवसांनी त्यांनीच ती रोपे योग्य प्रमाणात लावली, खतपाणी वेळच्यावेळी दिल्यानंतर झाडांना भरपूर फुलं लागली रामू आणि रामूची पत्नी दोघंही बाग पाहून आनंदीत झाली.

त्यानंतर रामूने आपल्या परिश्रमाने फार मोठी फुलबाग बनवली. आजूबाजूला रामूची आणि रामूच्या पत्नीची वाहवा होऊ लागली. रामूच्या फुलांचा धंदा इतका वाढला, की व्यापारी स्वत; येऊन फुलं घेऊन जाऊ लागले. आता रामू कोणाकडे मोलमजूरी करायला जात नव्हता; परंतु रामूकडेच १०/२० माणसं रोज काम करायला येत असत.

मित्रांनो, मेहनत आणि प्रामाणिकपणा माणसाला सर्वकाही देतो.

❑❑❑


# हार्दिक अभिनंदन !!!



आपले हसती दुनिया (मराठी) चे संपादक आ. श्री. राजेंद्र थोरातजी यांना ५ सप्टेंबर रोजी महापौरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हसती दुनिया परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

– सुरेश तिर्लोटकर
सह संपादक




# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा




राम व शाम दोघेही खेळात रंगून गेले होते. खेळता-खेळता बॉल खूप उंच गेला.
बॉल कुठे गेला हे त्यांना समजले नाही. ते दोघेही बॉल शोधू लागले.
बॉल शोधता-शोधता जमिनीवर एक कलिगंडाची वेल आणि एक जांभळाचं झाड रामला दिसलं


जांभळाच्या झाडावर खूप काळीभोर जांभळं लागली होती. रामने शामला बोलावले आणि जांभळाचे घोस दाखवले.
राम शामला म्हणाला, बघ ना शाम ! झाडावर खूप जांभळं पिकलेली आहेत; परंतु झाड उंच असल्यामुळे आपण काढू शकत नाही.
निसर्गाची रचनासुध्दा अजब आहे. लहानशा जांभळासाठी एवढं मोठं उंच झाड आणि इतकं मोठं कलिंगड खाली जमिनीवर !


राम म्हणाला, किती चांगलं झालं असतं जर जांभळं जमिनीवर लागली असती ....... रामचं बोलणं शाम गुपचूप ऐकत होता.
अचानक एक जांभूळ झाडावरुन रामच्या डोक्यावर पडलं. रामने झटकन उडी मारली.
शाम म्हणाला, राम तुझ्या डोक्यावर हे लहानसं जांभूळ पडलं तर इतका उडालास. जर तेच कलिंगड डोक्यावर पडलं असतं तर काय झालं असतं ?
राम झटकन म्हणाला, मग तर माझा कपाळमोक्ष झाला असता.
शाम म्हणाला, निसर्गाने जे निर्माण केलं आहे ते बरोबर आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा दोष काढणं बरोबर नाही.
मुलांनो, या गोष्टीतून हीच शिकवण मिळते, की निसर्गातील कोणत्याही रचनेची आपण निंदा करायची नाही. कारण निसर्ग हा परमेश्वराची रचना आहे. त्याने जशी बनविली आहे तशीच ठीक आहे.

# सुवर्णकन्या - राही सरनोबत



भारताची नेमबाज राही सरनोबत हिने बुधवारी २५ मीटर एअर पिस्तुल प्रकारात सुवर्णपदकाची कमाई करुन इतिहास घडविला आहे. इंडोनेशियातील पालेम्बांग येथे झालेल्या आशियाई क्रिडास्पर्धेत थायलंडच्या नफास्वान यांगपाईबून हिच्याशी झालेली तिची लढत अत्यंत चुरशीची होती. श्वास रोखून धरायला लावणारे दोन शूट-ऑफ हे या दोन्ही नेमबाजांची कसोटी पाहणारे ठरले. त्यात राहीने सुवर्णपदक पटकावले. आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी ती भारताची पहिलीच नेमबाज ठरली. गोल्डनगर्ल तेजस्विनी सावंत हिच्याबरोबर राहीने देशाबरोबरच कोल्हापूरचे नावही जगाच्या नकाशावर पुन्हा झळकवले. राहीची यावेळी प्रतिक्रिया अत्यंत प्रामाणिक आहे. यशाचे श्रेय प्रशिक्षक मुन्खबायर यांना देतानाच याआधी, तांत्रिकदृष्ट्या एकाग्रता कुठेतरी डळमळीत होत होती. मात्र सरांच्या डावपेचांमुळे, तयारीमुळे एकाग्रता अभंग राहिली आणि ही कामगिरी करु शकले, असे सांगितले. याआधी राहीने विश्वचषक स्पर्धेत पिस्टल प्रकारात भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले होते. तसेच २०१३ मध्ये कोरियातील स्पर्धेत सुवर्ण, राष्ट्कुलमध्ये सुवर्ण आणि २०१४ मधील आशियाई स्पर्धेत ब्रांझही पटाकवले आहे. २०१२ मधील लंडन ऑलिम्पिकसाठी ती पात्र ठरली होती. राहीच्या गाठीशी असा दीर्घ अनुभव आहे. तथापि, अशा स्पर्धांमध्ये नाही म्हटले तरी देशाचे प्रतिनिधित्व करत असल्याचा खेळाडूच्या मनावर काहीसा ताण असणारच. त्यातही पुढे तुल्यबळ स्पर्धक असेल तर आत्मविश्वास काहीसा डळमळण्याचीही शक्यता असते. या टप्प्यावर एकाग्रता ढळू न देता खेळावर लक्ष केंद्रित करणे आवश्यकच असते. अशा कसोटीच्या क्षणी मानसिकदृष्ट्या कसे सक्षम राहायचे, याचा पाठ राहीला योग्यवेळी मिळाला. त्याला तिच्या कौशल्याची जोड मिळाली आणि ती देशाला सुवर्णपदक मिळवून देऊ शकली. राहीला आता पुढचा टप्पा गाठायचा आहे.

❑❑❑



# दहन रावण पुतळ्याचे


दसऱ्या दिवशी दशाननाचे पुतळे दहन करिती
रामलक्ष्मण हनुमंताचा जयजयकारही करती ।।ध्रु।।

अगडबंब असा तो पुतळा, चौकात उभा करती
ढोल ताशा बढवित, नाचती तया भवती
प्रत्येकास असेच वाटे जणू, आलो लंकेवरती ।।१।।

चौफेर नजर फिरवूनी, रावण पाहे नयनी
अखेरची मम इच्छा, मज राम भेटवा कुणी
जमलेली सारी मंडळी, एकमेकांकडे बघती ।।२।।

हा तर माझा पुतळा, जिवंत मी तुमच्यात
काय अर्थ या रामाच्या, नावाच्या जयकारात
उगाच काय तमाशा, करता पुतळ्याभवती ।।३।।

होईल सफल तेव्हा, पुतळ्याचे या दहन
जळेल तुमच्यामधला, अभिमानरुपी रावण
हृदयमंदिरी मग रामाची, होईल सदा वसती ।।४।।




# रोहीडा

सह्याद्रीच्या डोंगररांगेत भोर ते महाबळेश्वर असा एक सुरेख डोंगरमार्ग आहे. या डोंगररांगेत तीन ते चार किल्ले आहेत. यापैकी रोहीड खोऱ्यात वसलेला किल्ला म्हणजेच 'किल्ले रोहीडा'. रोहीड खोरे हे नीरा नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. या खोऱ्यात ४२ गावे होती. त्यापैकी ४१ गावे सध्याच्या पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात मोडतात. रोहीडा किल्ला हे रोहीड खोऱ्याचे प्रमुख ठिकाण होते. पुणे, सातारा जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, सहकारी दूधयोजना यामुळे येथील परिसरातील बहुतेक सर्व गावापर्यंत बस, वीज आदी सुविधा पोहोचल्या आहेत. त्यामुळे येथील जीवन सुखी झालेले आहे. रोहीडा किल्ला भोरच्या दक्षिणेस सुमारे ६ मैलांवर आहे. रोहीडा किल्ल्याला 'विचित्रगड' किंवा 'बिनीचा किल्ला' असे देखील संबोधले जाते.

## इतिहास :

या किल्ल्याची निर्मिती ही यादवकालीन आहे. या किल्ल्यावरील तिसऱ्या दरवाजावर असणाऱ्या शिलालेखावरुन मुहम्मद आदिलशहाने ह्या गडाची दुरुस्ती केली असे अनुमान निघते. या शिलालेखावरुन मे १६५६ नंतर हा किल्ला शिवाजी महाराजांनी बांदल देशमुखांकडून घेतला असे समजते. किल्ला घेण्यासाठी राजांना बांदल देशमुखांशी हातघाईची लढाई करावी लागली. यात कृष्णाजी बांदल मारला गेला. बाजीप्रभू देशपांडे बांदलाचे मुख्य कारभारी होते. लढाईनंतर बाजीप्रभू देशपांडे व इतर सहकाऱ्यांना स्वराज्यात सामील करुन घेतले गेले. इ.स. १६६६ च्या पुरंदरच्या तहानुसार हा किल्ला मुघलांच्या स्वाधीन केला गेला. २४ जून १६७० रोजी शिवरायांनी किल्ला परत घेतला. कान्होजी यांच्याकडे भोरची पूर्ण तर रोहीडा किल्ल्याची निम्मी देशमुखी व जमिनीचे काही तुकडे इनाम होते. रोहीड्याचे गडकरी त्यांचेकडून ३० होन घेत होते. शिवाजी महाराजांच्या अधिकाऱ्यांनी शिवाजी महाराजांकडे विचारणा केली की ३०च होन का, शिवाजी महाराजांनी निर्णय दिला की, जेधे आपले चाकर असल्यामुळे पूर्वापार चालत आलेले द्रव्यच घ्यावे. पुढे किल्ला मुघलांनी जिंकला, मात्र भोरच्या पंत सचिवांनी औरंगजेबाशी झुंजून किल्ला स्वराज्यात पुन्हा दाखल केला. संस्थाने विलीन होईपर्यंत राजगड, तोरणा, तुंग आणि तिकोना

किल्ल्याप्रमाणे हाही किल्ला भोरकरांकडे होता.

### पाहण्याची ठिकाणे :

पहिल्या दरवाज्याच्या चौकटीवर गणेशपट्टी आणि वर मिहराब आहे. पुढे १५ ते २० पायऱ्या पार केल्यावर दुसरा दरवाजा लागतो येथून आत गेल्यावर समोरच पाण्याचे भुयारी टाके आहे याचे पाणी बाराही महिने पुरते. येथून ५७ पायऱ्या चढून गेल्यावर तिसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा अतिशय भक्कम आहे. यावर बऱ्याच प्रमाणात कोरीव काम आढळते. दोनही बाजूस हत्तीचे शिर कोरण्यात आले आहे. तसेच डाव्या बाजूला मराठी व उजव्या बाजूला फारसी शिलालेख आहे. आजूबाजूच्या तटबंदीची पडझड झाली आहे.

येथून आत शिरल्यावर समोरच २ वास्तू दिसतात. एक गडावरील सदर असावी, तर दुसरे किल्लेदाराचे निवासस्थान असावे. डाव्या बाजूला थोडे अंतर चालून गेल्यावर रोहिडमल्ल उर्फ भैरावाचे मंदिर लागते. मंदिरासमोर लहानसे टाके, दीपमाळ व चौकोनी थडगी आहेत. देवळात गणपती, भैरव व भैरवी यांच्या मूर्ती आहेत.

रोहीड्याचा घेर तसा लहानच आहे. किल्ल्याच्या आग्नेयेस शिरवले बुरुज, पश्चिमेस पाटणे बुरुज व दामगुडे बुरुज, उत्तरेस वाघजाईचा बुरुज व पूर्वेस फत्ते बुरुज व सदरेचा बुरुज असे एकूण ६ बुरुज आहेत. गडाची तटबंदी व बुरुजांचे बांधकाम अजूनही मजबूत आहे.

गडाच्या उत्तरेकडील भागात टाक्यांची सलग रांग आहे. येथेच एक भूमिगत पाण्याचे टाके आहे. तेथेच मानवी मूर्ती व शिवपिंडी आहे. संपूर्ण गड फिरण्यास साधारणत: दीड तास लागतो.

### पोहोचण्याच्या वाटा :

१) बाजारवाडी मार्गे :

भोरच्या दक्षिणेस ८-१० किमी अंतरावर बाजारवाडी नावाचे गाव आहे. बाजारवाडीपर्यंत जाण्यासाठी एस.टी. सेवा उपलब्ध आहे. बाजारवाडीपासून मळलेली वाट गडाच्या पहिल्या दरवाजापाशी घेऊन जाते. वाट अत्यंत सोपी असून दरवाजापर्यंत पोहोचण्यास एक तास लागतो.

२) अंबवडे मार्गे :

भोर ते अंबवडे अशी एस.टी. सेवा उपलब्ध आहे. पुणे-भोर-पानवळ-अंबवडे अशी बससेवा देखील उपलब्ध आहे. या गाडीने अंबवडे गावी उतरुन गावाच्या पूर्वेकडील दांडावरुन गड चढण्यास सुरुवात करावी. ही वाट लांबची आणि निसरडी आहे. या वाटेने गड गाठण्यास सुमारे अडीच तास लागतात. शक्यतो गडावर जाताना बाजारवाडी मार्गे जावे आणि उतरताना नाजरे किंवा अंबवडे मार्गे उतरावे. म्हणजे रायरेश्वराकडे जाण्यास सोपे जाते.

३) रोहीडा ते रायरेश्वर वाटा :

अ) भोर : कारी बसने कारी गावात उतरावे. तिथून लोहदरा मार्गे २ तासात रायरेश्वर पठाराकडे पोहोचतो व पठारावरील वस्तीपर्यंत जाण्यास दीड तास लागतो.

ब) वडतुंबी मार्गे दुपारची (२.४५) भोर - टिटेघर गाडी आंबवण्यास येते, तिने वडतुंबी फाट्यावर उतरावे. तिथून १५ मिनिटांत वडतुंबी गाव गाठणे. येथून साधारणत: २ तासात गणेशदरा मार्गे रायरेश्वर पठारावर पोहोचता येते.

क) भोर - कोर्ले गाडीने कोर्ले गावात उतरावे. रात्री उशीर झाल्यास गावात मुक्काम करुन पहाटे गायदरा मार्गाने ३ तासात रायरेश्वर पठारावरील देवळात जाता येते.

ड) भोर - दाबेकेघर बसने दाबेकेघरला उतरावे व तिथून धानवली पर्यंत चालत जावे. पुढे वाघदरामार्गे ३ तासात रायरेश्वर गाठता येते.

❑❑❑



# जमिनीवर बसून जेवणाचे १० फायदे

१) पचन सुधारते. जमिनीवर मांडी घालून बसल्याने अर्धपद्मासनाची स्थिती निर्माण होते. तसेच जमिनीवर ताट असल्याने जेवणाचा घास घेण्यासाठी वाकावे लागते. या सतत होणाऱ्या शारीरिकहालचालीमुळे पोटाजवळील स्नायूंना चालना मिळते व पचनाची क्रियादेखील सुधारते.

२) वजन घटवण्यास मदत होते. जमिनीवर बसून जेवल्याने, वजन कमी होण्यासही मदत होते. वजन वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रमाणापेक्षा अधिक खाणे. जमिनीवर बसून जेवताना 'वेगस नर्व्ह' (पोटाकडून मेंदूला संकेत देणारी) भूक व जेवणाचे प्रमाण योग्यप्रकारे राखू शकते. टेबलापेक्षा जमिनीवर बसून जेवल्याने, जेवणाचा वेग मंदावतो व पोट आणि मेंदूतील समन्वयता सुधारते. परिणामी अतिप्रमाणात खाण्याची वृत्ती कमी होते व वजनही काबूत राहते.

३) लवचिकता वाढवते. पद्मासनात बसल्याने, पाठीचे, कमरेतील तसेच पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने पचनसंस्थेचा मार्ग सुधारतो. अशा स्थितीत बसल्याने पोटावर ताण येण्याऐवजी जेवण पचण्यास व ग्रहण करण्यास मदतच होते. परिणामी पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने शरीर लवचिक व आरोग्यदायी बनण्यास मदत होते.

४) मन शांत होते व खाण्यावर लक्ष केंद्रित होते. जमिनीवर बसून जेवल्याने मेंदू शांत होतो व तुमचे सारे लक्ष जेवणाकडेच राहते. मनाची अस्थिरता कमी झाल्याने, जेवणातून मिळणारी पोषणतत्त्वे शरीर अधिक उत्तम प्रकारे ग्रहण करण्यास समर्थ होते.

५) कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते. दिवसातील किमान एका जेवणाचा आपल्या कुटुंबासोबत जरुर आनंद घ्यावा. दिवसभरातील शीण व ताणतणाव हलका होतो. तसेच एकमेकांशी बोलल्याने, काही समस्यांतून मार्ग शोधण्यास मदत होते व नकळत कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते.

६) शरीराची स्थिती (पॉश्चर) सुधारते. शरीराची स्थिती उत्तम राखणे हे निरोगी आरोग्याचे गमक आहे. शरीरातील काही स्नायू व सांध्यांवरील अतिरिक्त ताण कमी करुन थकवा कमी होण्यासदेखील मदत होते. जमिनीवर बसून जेवताना पाठीचा कणा ताठ राहतो व पोट, खांदा व पाठीच्या स्नायूंची योग्य प्रमाणात हालचाल होते.

७) दीर्घायुषी बनवते ही अतिशयोक्ती नाही. जमिनीवर बसून जेवल्याने आयुष्य वाढते. जमिनीवर मांडी घालून बसलेली व्यक्ती जर कशाचाही आधार न घेता उठली तर त्यांचे आयुष्यमान अधिक आहे, असे समजावे

८) गुडघे व कमरेतील सांधे मजबूत होतात. Yoga for Healing या पुस्तकाचे लेखक पी.एस.वेंकटेशवरा यांच्यामते, पद्मासनामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. पचन संस्थेसोबतच सांधेदुखीचा त्रास होत नाही. गुडघा, घोटा व कंबरेतील सांधे लवचिक झाल्याने अनेक विकार दूर राहण्यास मदत होते. जमिनीवर बसल्याने स्नायूंबरोबर सांध्यांची लवचिकतादेखील वाढते.

९) चंचलता कमी होते, मांडी घालून किंवा पद्मासनात बसल्याने नसांमधील थकवा कमी होतो. म्हणूनच जेवताना जमिनीवर मांडी घलून बसण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे मन, मेंदू व परिणामी शरीरातील त्रास कमी होतात.


१०) हृदयाला होणारा रक्त पुरवठा सुधारतो. काही वेळेस जेवल्यानंतरही तुम्हाला गरम होते किंवा घाम आल्याचे आठवते का? हो हे शक्य आहे. कारण अन्नाचे पचन होण्यासाठी शरीराला उर्जेची अधिक गरज असते. खुर्चीवर बसण्याऐवजी जमिनीवर बसून जेवल्याने शरीरातील रक्त प्रवाह सुधारतो. तसेच पचनही सुधारते.



# आसन : वृश्चिकासन

संस्कृतमध्ये वृश्चिक या शब्दाचा अर्थ विंचू असा होतो. या आसनस्थितीत शारीरिक आकृतिबंध विंचवाच्या आकाराप्रमाणे दिसतो. त्यामुळे या आसनास वृश्चिकासन असे म्हणतात. जे लोक शिर्षासन व हस्तवृक्षासन चांगल्याप्रकारे करु शकतात, त्यांना हे आसन सहजतेने करता येते.

**कृती :** सुरुवातीला हे आसन भिंतीच्या आधाराने करावे. चित्रात दाखविल्याप्रमाणे दोन्ही हात व कोपरे जमिनीवर ठेवा. त्यानंतर भिंतीच्या आधाराने पोट भिंतीला लावा व पाय भिंतीशी सरळ ठेवा. ही स्थिती साधल्यावर पाय भिंतीपासून पाच-सहा से.मी. लांब करुन तोल सावरण्याचा प्रयत्न करा. स्वाभाविक श्वासोच्छवास चालू ठेवा. सुरुवातीला काही दिवस अशा प्रकारचा सराव चालू ठेवा. तुम्ही सहजतेने तोल सांभाळू शकाल तेव्हा पाय गुडघ्यात दुमडा आणि पायाचे तळवे डोक्यावर ठेवा. पुष्कळ सरावानंतर फक्त हाताच्या पंज्यांवर शरीराचा तोल सावरुन हे आसन करु शकाल.



**फायदे :**

- ❐ या आसनाच्या नियमित सरावामुळे हात आणि खांदे मजबूत सुदृढ बनतात. तसेच पोटाच्या स्नायूंना चांगला व्यायाम मिळतो.
- ❐ या आसनामध्ये पाठीचा कणा मागील बाजूस वाकवला जातो त्यामुळे पाठीचा कणा लवचिक बनतो.
- ❐ शीर्षासन, चक्रासन आणि धनुरासनापासून मिळणारे सर्व फायदे या आसनामुळे देखील प्राप्त होतात.

# वाढदिवसाच्या
## हार्दिक शुभेच्छा...!



आर्या चाळके


प्रगती चव्हाण


तनिष्का शेलार



शितल जिरे


तरेश थोरात


कार्तिक जवादे


ओम वाडेकर


अभिनव भुयेकर


समृध्दी पाटील


हितांशी पाटील


अपेक्षा भवार


ईश्वरी भुयेकर

# वाढदिवसाच्या

## हार्दिक शुभेच्छा...!



स्वरा सोनवणे



सुजाता जाधव



अर्जुन इहाळे



सृष्टी खर्शी



रेहान कदम



प्रचित इंगळे



इशिता रेपाळे



दिलीप कुभांर




अर्णव जाधव



आकर्षण कदम



कनिका मजगे



सान्वी कोळी

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : कोंबडीच्या अंड्याची रचना कशी असते ?**

**उत्तर :** कुठलेही अंडे हे अंडाकृती असते. हा अंडाकृती आकार चेंडूप्रमाणे गोल नसतो किंवा लंबगोलाकारही नसतो. बाहेरच्या बाजूला अंड्याचे कवच असते. आतल्या बाजूला एक पातळ पापुद्रा असतो. या पापुद्र्याच्या फुग्यासारख्या पिशवीमध्ये पांढरा रस असतो. कवच व पापुद्र्याची पिशवी यात हवेची पोकळी असते. पांढऱ्या रसात पिवळा बलक असतो. तो दोन स्नायूच्या धाग्याने लोंबकळत ठेवलेला असतो. ती सुध्दा पिशवीच असते. अंडे कसेही घरंगळले तरी बलकातला गर्भ/जीव मंदपणे झोके घेत राहतो.

**प्रश्न : कोरड्या केलेल्या काचेच्या पेल्यात बर्फाचे खडे टाकले तर थोड्या वेळाने पेल्याची बाहेरची बाजू ओलसर का होते ?**

**उत्तर :** पेल्याच्या भोवती हवा असते. ह्या हवेत पाण्याची वाफ समावलेली असते. पेल्यामध्ये बर्फ घातल्याने पेल्यातील व पेल्यालगतची हवा खूप थंड होते. बाहेरील हवेतील पाण्याच्या वाफेचे रुपांतर पाण्याच्या थेंबात होते व ते थेंब पेल्याच्या बाहेरच्या पृष्ठभागावर जमा होतात. त्यामुळे पेला बाहेरुन ओला झालेला दिसतो.

**प्रश्न : काजवा रात्री कसा चमकतो ?**

**उत्तर :** काजव्याच्या पोटाच्या खालच्या बाजूला प्रकाशनिर्मिती करणारा भाग असतो आणि मज्जेद्वारे त्याचे नियंत्रण होते. त्यात 'ल्युसिफेरीन' आणि 'ल्युसिफेरस' नामक रसायने असतात. ल्युसिफेरिनचा ऑक्सिजनशी संयोग झाल्याने प्रकाश निर्मिती होते. ल्युसिफेरस क्रियाप्रेरक म्हणून काम करतो. अशा प्रकारच्या प्रकाश निर्मितीच्या प्रक्रियेला 'जीवदिप्ती' असे म्हणतात. काजव्यातून उत्सर्जित होणारा प्रकाश पिवळा किंवा नारिंगी असतो.

**प्रश्न : कुत्र्या-मांजरासारखे प्राणी कधी कधी कोवळे गवत खाताना का आढळतात ?**

**उत्तर :** कुत्र्या-मांजरासारखे प्राणी जेव्हा त्यांना मलावरोधचा अतिरेक होतो त्यावेळी कोवळे गवत खातात. कारण वनस्पतीजन्य तंतूमय पदार्थ मलावरोध दूर करतात. माणसाला हा पदार्थ पालेभाज्यातून मिळतो. काही वेळा वाघ, सिंह, लांडगे हे प्राणी मारलेल्या भक्षाचे केसाळ भाग खाऊन मलावरोध दूर करतात. केसांना त्यांचे शरीर पचवू शकत नाही. त्यामुळे वनस्पतीजन्य तंतूमय पदार्थांचे काम हे केस करतात.




# अहमदहन

मित्रांनो, रावण हा शब्द ऐकला, लिहिला किंवा वाचला तर त्या शब्दामुळे आपल्याला रामायणातला रावण आठवतो. तो रावण, ज्याच्या आचरणातून क्रोध, द्वेष, अहंकार, लोभ, लालसा आणि दुसऱ्याला हानी पोचवण्याचेच काम झाले. पण हाच रावण महापराक्रमी योध्दा, शास्त्रांचा प्रखर ज्ञाता, तेजस्वी होता. काही पुस्तकात रावणाविषयी जसं नकरात्मक लिहिले गेले आहे तसं त्याच रावणाविषयी सकारात्मक सुध्दा सांगितले गेले आहे. मग प्रश्न असा पडतो, की जो रावण सकारात्मक होता तो रावण अचानक दुष्ट कसा झाला ? तर त्याचे कारण असे आहे, रावणाचा अहंकार व अज्ञान. रावणाला स्वतःच्या शक्तीचा व ज्ञानाचा अहंकार होता. हेच कारण त्याच्या विनाशाला पात्र ठरले.

मित्रांनो, म्हणूनच रावणाचा पुतळा जाळला जातो. पण तो खरा रावण नसतो, तो तर एक पुतळा असतो. रावण नावाचे शरीर तर हजारो वर्षापूर्वीच नाश झाले. परंतु शरीर नाश होऊनही आणि बरीच वर्षे पुतळे जाळूनही रावणात असलेले अवगुण अजूनही माणसात जिवंत आहेत. क्रोध, वैर, द्वेष, अहंकार, लालसा आणि अज्ञान याच अवगुणामुळे रावणाने जो विनाश स्वतःवर ओढवून घेतला; त्या विनाशाची आठवण माणसाला व्हावी म्हणूनच रावणाचे पुतळे जाळतात. जेणेकरुन माणूस सन्मार्गी लागेल. रावणाचे पुतळे परत परत उभे राहतील आणि परत परत जाळले जातील; परंतु आपल्यात असलेल्या रावणासारख्या अवगुणांच्या पुतळ्याला आपणच कायमचे जाळून टाकू या. रावणदहन करण्याबरोबर अवगुणांचेही दहन करु या.

मित्रांनो, आपण कितीही ताकदवान, हुशार व श्रेष्ठ असलो तरीही त्या ज्ञानाचा किंवा त्या शक्तीचा अहंकार करु नये. आपल्या ज्ञानाचा उपयोग हा सकारात्मकच करावा. धरतीवर जे जे अवतारी पुरुष आले त्यांनी सदैव आपल्या शक्तीचा सदुपयोग केला. आपणही आपल्या शक्तीचा व ज्ञानाचा सदुपयोग करायचा आहे. संकुचितपणाच्या सीमा ओलांडून सीमोलंघन करायचे आहे. सोने म्हणून सद्‌गुण वाटायचे आहेत.

**संग्राहक : अंकित चं. जाधव**



# पुणे

**मुख्यालय :** पुणे

**तालुके :** पुणे शहर, हवेली (पुणे), खेड (राजगुरु नगर), आंबेगाव, जुन्नर, मावळ (वडगाव), मुळशी (पौंड), भोर, वेल्हा, पुरंदर (सासवड), शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती)

**नद्या :** प्रमुख नदी भीमा. नीरा, मुळा, मुठा, घोड, भामा, कऱ्हा, इंद्रायणी, पवना, मांडवी, कुकडी, मीना

**सीमा :** उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, आग्नेयेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस रायगड जिल्हा, वायव्य दिशेला ठाणे जिल्हा आहे.

**प्रमुख शेतकी उत्पादने :** ज्वारी, भात, ऊस, बाजरी, मका, भुईमूग, डाळी व भाजीपाला

**खनिजे :** बांधकामासाठी लागणारा दगड

**धरणे :** मुळशी (मुळा), खडकवासला, पानशेत, पिंपळगाव, डिंभेम भाटघर, चासकमान, वरसगाव, जोगा

**थंड हवेचे ठिकाण :** लोणावळा, खंडाळा

## विशेष माहिती :

❒ पुणे शहर हे विद्येचे माहेरघर, पेशव्यांची राजधानी आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून परिचित आहे.

❒ भीमाशंकर हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग पुणे जिल्ह्यात आहे.

❒ मोरगाव, ओझर, थेऊर, रांजणगाव व लेण्याद्री ही अष्टविनायकाची स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत. अष्टविनायकांच्या आठ स्थानांपैकी पाच स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत.

❒ संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी इंद्रायणी काठी वसलेल्या आळंदी येथे वारकरी संप्रदायाचा पाया घातला तर देहू येथे संत तुकाराम महाराजांनी वास्तव्य करुन या संप्रदायाचा कळस उभारला.

❒ १९१७ साली स्थापन झालेल्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेने महाभारताची संपूर्ण संशोधित प्रत तयार करण्याचे प्रचंड काम पूर्ण केले आहे.

❒ छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यात झाला.

❒ भीमा नदीचा उगम भीमाशंकर येथे होतो.

❒ पुणे शहराच्या मध्यावर मुठा नदीकाठी पहिल्या बाजीराव पेशव्यांनी शनिवारवाडा १७३० मध्ये बांधला.

❒ आगाखान पॅलेस येथे महात्माजींना स्वातंत्र्य आंदोलनाच्यावेळी स्थानबध्द करुन ठेवले होते. महात्माजींच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांचे येथेच निधन झाले. त्यांची समाधी आगाखान पॅलेसच्या आधारावरच आहे.

❒❒❒



# बोल आणि कर्म



सत्संग भवन एका शाळेप्रमाणे आहे. कारण ज्या ज्या वेळी आपण सत्संगाला येतो त्या त्या वेळी काही नवीन शिकायला मिळते. शिकण्याच्या भावनेचा कधी अंत होत नाही. लहानसा बालकसुध्दा खूप काही शिकवण देऊन जातो. म्हणून हेच सांगत आलो आहोत, की ही शिकवण सत्संग भवनपर्यंतच सीमित न ठेवता आपण जगामध्ये वावरत असतानाही याची चर्चा करायला पाहिजे. आपण संगतमध्येच या शिकवणीची चर्चा करतो, वास्तविक ही शिकवण दैनंदिन जीवनामध्ये आचरणात आणली पाहिजे. प्रत्येकाने आपला स्वभाव असा बनवला पाहिजे की आपले जीवनच इतरांसाठी शिकवण ठरावी. एखादी व्यक्ती आम्हाला पहिल्यांदा, दुसऱ्यांदा किंवा तिसऱ्यावेळी जरी भेटली तरी त्याच्यावर आपल्या जीवनाचा इतका प्रभाव पडला पाहिजे, की त्याच्या मनात आमच्याबद्दल इतके आकर्षण निर्माण व्हावे, की त्याला वाटावे हा माणूस इतर लोकांपेक्षा इतका वेगळा का आहे ? याच्यात जरुर काही विशेष रहस्य आहे. बाबाजींची शिकवण आमच्या कर्मामधून, आमच्या वचनांमधून आणि आमच्या दैनंदिन व्यवहारातून प्रत्येक क्षणी दिसली पाहिजे.


ज्याप्रमाणे एखादा मनुष्य नवीन दुकान उघडतो आणि त्यामध्ये खूप चांगल्या वस्तू ठेवतो, परंतु त्या दुकानापर्यंत जाण्याचा रस्ता फार घाणेरडा आणि खराब असेल तर त्या दुकानात कोणी जाणार नाही. कारण रस्ता खराब आहे. असेच आपलेही आहे - लोक म्हणतील, की हा बोलतो फार चांगले, याच्या बोलण्यातून असं वाटतं, की हा माणूस फारच चांगला आहे; परंतु जर त्याचा व्यवहार पाहिला तर तो बोलतो तसा नसून फार वेगळाच आहे. एकदम विपरीत बदल झालेला दिसून येतो.

म्हणून म्हटलं जातं, की आमचे बोल आणि आमचे कर्म दोन्हीही एकसारखी असावी. जेणेकरुन मिशनची शिकवण सर्व विश्वभर प्रसारीत करु शकू.

(माता सविंदर हरदेवजी )



# हसा मुलांनो हसा



एक उंदीर दारुच्या ग्लासामध्ये पडला. बाजूने मांजर चालली होती. उंदीर मांजरीला म्हणाला, मला ग्लासातून बाहेर काढ. वाटल्यास नंतर मला खा.


मांजरीने लाथ मारुन ग्लास पाडून टाकले. लगेच उंदीर उठला आणि बिळात घुसला.

मांजर म्हणाली, खोटारडा, धोकेबाज; तू म्हणालास मला बाहेर काढ आणि वाटल्यास मग मला खा.

उंदीर हसत म्हणाला म्यावताई नाराज होऊ नको; मी त्यावेळी दारुच्या नशेत होतो ना...



एक दारुडा रेल्वे ट्रॅकवर झोपलेला असतो. तेवढ्यात तिथे उभा असलेला एक माणूस त्या दारुड्याजवळ जातो आणि म्हणतो, अरे उठ इथून... गाडी आली तर जीव जाईल तुझा. दारुडा उठतो आणि म्हणतो, अरे ए... काय पण सांगू नकोस. आत्ताच माझ्या डोक्यावरुन विमान गेलं तरी मला काही नाही झालं. मग ही ट्रेन माझं काय बिघडवणार!!



एका पुढाऱ्याचे विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर लगेच एका समाजसेवकाचे बस अपघातात निधन झाले. जेव्हा दोघे स्वर्गात भेटले, तेव्हा पुढारी म्हणाला, "आपल्यासारखा समाजसेवक येथे हवाच होता, पण आपल्याला येथे येण्यास उशीर का लागला?" समाजसेवक म्हणाला, "साहेब, आपण विमानाने आलात. मी एस.टी. बसने आलो."



पुण्यामध्ये एका क्लासची जाहिरात होती. 'एका महिन्यात फाडफाड इंग्रजी बोलायला शिका. स्त्रियांना ५० टक्के सवलत'

गण्यानं विचारलं, 'स्त्रियांना ५० टक्के सवलत? स्त्रीपुरुष समानतेच्या युगात हा भेदभाव कशाला?'
क्लासवाले - कारण, स्त्रिया फाडफाड आधीपासूनच बोलत असतात. त्यांना फक्त इंग्रजीच शिकवायचं असतं ना.

सखारामने सासऱ्याला म्हटले, "दिवाळसणाला पेट्रोलवर चालणारी एखादी गोष्ट द्या."

सासरेबुवानी ते मान्य केले. सखाराम खुशीत दिवाळसणासाठी सासुरवाडीला गेला. सासरेबुवांनी मोठ्या प्रेमाने त्याला पेट्रोलवर चालणारी एक गोष्ट दिली. ती पाहून सखाराम आश्चर्याने उडालाच. कारण सासरेबुवांनी चक्क पेट्रोलवर चालणारा एक 'लायटर' दिला.

---

एका प्रायोगिक नाटकात एक खरोखरचे गाढव पात्र म्हणून काम करणार होते. नाटक पाहायला खूप लोक जमले. नाटक एकूण कंटाळवाणे होते. शेवटी दिग्दर्शकाने गाढवाला स्टेजवर बोलावले, ते गाढव आले आणि दिग्दर्शकाला लाथ मारुन निघून गेले. 'अरे वा! ते गाढव नुसते कलाकार नाही तर समीक्षकही दिसतेय!' प्रेक्षकात कोणीतरी म्हणाले.

---

शिक्षक - मुलांनो, केळ्याबरोबर केळ्याच्या सालीही खात राहा. त्यामुळे हात-पाय धड राहतात.

बबन - गुरुजी, केळ्याच्या साली आणि हात-पाय धड राहण्याचा संबंध काय?

शिक्षक - बाळांनो, तुम्ही केळ्याच्या साली खाल्ल्यात तर रस्त्यावर जाणाऱ्या येणाऱ्यांचे पाय न घसरल्यामुळे हात-पाय धडधाकट राहतील की नाही?

---

एकदा गुरुजींनी 'गरीब कुटुंब' या विषयावर मुलांना निबंध लिहायला सांगितला तेव्हा श्रीमंत असलेल्या एका मुलाने असा निबंध लिहिला. "एक गरीब घर होते. वडील गरीब होते. आई गरीब होती, त्यांचा नोकर गरीब होता. आचारी गरीब होता. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर गरीब होता..."

# समर्थांचा उपदेश

समर्थांची स्वारी परळीवर असताना एके दिवशी त्यांनी काही शिष्यमंडळींना हाक मारली व म्हणाले, “आम्ही आजपासून पंधरा दिवस ह्या खोलीत बसणार, आम्ही आत बसल्यावर तुम्ही बाहेरुन कुलूप लावून घ्यावे. सोळाव्या दिवशी कुलूप काढून पाहावे.” असे म्हणून समर्थ खोलीत जाऊन बसले. शिष्य मंडळींनी आज्ञेप्रमाणे सर्व व्यवस्था केली.

इकडे जांबेस त्यांच्या मातोश्रींचा मृत्यू जवळ आला. तेव्हा त्यांनी श्रेष्ठांच्या मांडीवर मस्तक ठेवले. मनात समर्थांची आठवण होऊन त्या म्हणाल्या, “माझा नारायण माझ्या अंत:काळी समीप नाही.” इतक्यात समर्थ येऊन पोचले, त्यांनी मातोश्रींना साष्टांग नमस्कार घातला. ते मातोश्रींना म्हणाले, “मातोश्री, आता कोणत्याही प्रकारचा खेद मनात धरु नये. आपण साक्षात भगवती, मूळमाया आहात. आपण आम्हाला जन्म देऊन उध्दार केलात.”

असे अनेक प्रकारे त्यांचे समाधान केले. इतक्यात प्राण व्याकूळ झाला. तेव्हा ‘शिवशिव’ उच्चार करुन राम शब्दाबरोबर त्या परधामी निघून गेल्या.

इकडे परळीवर सोळाव्या दिवशी आज्ञेप्रमाणे शिष्यांनी जाऊन कुलूप काढले. समर्थांची खोली उघडून पाहिली, तर समर्थ खोलीमध्ये नाही. हे पाहून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. इतक्यात कोणी येऊन बातमी सांगितली, की समर्थांची स्वारी आंग्लाईच्या मंदिरात बसली आहे. तेव्हा सर्व मंडळी तिकडे गेली. पाहतात तो समर्थ तेथे बसलेले आहेत. हा प्रकार पाहून सर्वांनी ‘हे काय?’ म्हणून विचारले. त्यावर समर्थांनी संगितले, “आमच्या मातोश्री निजधामास गेल्या, म्हणून जांबेस गेलो होतो.” ही सर्व लीला पाहून सर्वांना मोठे कौतुक वाटले.

समर्थांच्या मातोश्री गेल्याची बातमी छत्रपतींना समजली. तेव्हा तेही समर्थांच्या भेटीस आले व जांबेकडील सर्व हकीकत विचारली. ती समर्थांनी यथासंग सांगितली. यावेळी राजांनी दोन - तीन दिवस मुक्काम केला होता. याच वेळी समर्थांची प्रसन्नता पाहून राजांनी नम्रपणे प्रश्न केला, “मनुष्य जन्म घेतो त्याचे कारण काय?”

समर्थ म्हणाले, “बाप्पा, ही केवळ वासना. वासनेच्या योगाने जिवाला जन्म येतो.” त्यावर राजांनी विचारले, “ही वासना कोणत्या मार्गाने नाहीशी होते?” समर्थांनी उत्तर दिले, “सद्गुरुस शरण गेल्याने, अध्यात्म प्रावीण्याने आणि

उर्वरीत पान क्र.४३ वर



# झेनचा पराक्रम

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी मराठी शाळेमध्ये शिकत असताना चिंगीचा पराक्रम हा धडा वाचण्यात आला होता. तशाच प्रकारचे धाडस अशाच एका अल्पवयीन मुलीने केले आहे. तिचे नाव आहे झेन सदावर्ते.

बुधवार दिनांक २२ ऑगस्ट २०१८ रोजी परळ, मुंबई येथील १७ मजली क्रिस्टल टॉवरच्या १२व्या माळ्यावर सकाळी साडेआठच्या सुमारास आग लागली. त्यामुळे वरच्या सर्व माळ्यांवर धूरच धूर झाला होता. जो तो जीव वाचवण्यासाठी सैरावरा पळत होता. अशा परिस्थितीत अवघ्या १२ वर्षाच्या झेन सदावर्ते या मुलीने आपल्या कुटुंबियांचे व शेजारी मिळून १७ जणांचे प्राण वाचवले.

मुंबई उच्च न्यायालयातील वकील श्री. गुणरतन सदावर्ते हे आपल्या कुटुंबासह क्रिस्टल टॉवरच्या सोळाव्या माळ्यावर राहतात. सकाळी साडे आठ वाजता घरात धूर पसरला हे पाहून सदावर्ते यांनी घरातील गॅस, गीझरची तपासणी केली. परंतु त्यांना धूर बाहेरुन येत असल्याचे समजले. त्यावेळी त्यांची मुलगी झेन ही झोपलेली होती. धुरामुळे तिची आई जयश्री घाबरुन ओरडू लागल्यामुळे आवाज ऐकून झेनला जाग आली. तिने घराचा दरवाजा उघडला. पाहते तर पायऱ्यांवर प्रचंड धूर होता. जो तो आरडाओरड करत पळत सुटला होता. खिडक्या उघडल्यावरसुध्दा धुराचे लोट घरात येत होते. यावेळी लहानग्या झेनने प्रथम आपल्या आई वडिलांना शांत केले. प्रसंगावधान ठेवून तिने घरातील सुती कपडे ओले केले आणि ते नाकाशी धरुन शांतपणे श्वासोच्छवास करण्यास सांगितले.

धुरातील कार्बनच्या जास्त प्रमाणामुळे ऑक्सिजनचा पुरवठा पुरेसा होत नाही आणि श्वास गुदमरु लागतो अशावेळी नाकाला ओला कपडा लावून



श्वास घेतल्यास ओल्या कपड्यात धुरातील कार्बन शोषला जातो आणि आवश्यक ऑक्सिजनचा पुरवठा होत राहतो. हे शाळेत शिकवलेले तंत्र झेनच्या लक्षात होते. तिसऱ्या इयत्तेत शिकत असताना आपत्कालीन स्थितीत काय करावे याबद्दल तिने एक प्रोजेक्टही केला होता. झेन डॉन बॉस्को इंटरनॅशनल शाळेत शिकते. शाळेत आपत्कालीन व्यवस्थापनाचे धडे दिले जातात याचाच आपल्याला उपयोग झाल्याचे झेनने सांगितले.

सावधानता म्हणून तिने लगेच पेट घेतील अशा वस्तू प्रथम एका खोलीत टाकून खोली बंद केली. आईवडिलांसह जवळपास पंधराजणांना तिने बाल्कनीत बसवले. सुमारे अर्धा तास हे सर्वजण अशाप्रकारे श्वास घेत होते. त्यानंतर अग्नीशमन दलाच्या जवानांनी त्यांना सुखरुप बाहेर काढले. झेन या छोट्याशा बालिकेमुळेच या सर्वांचा जीव वाचला. झेनच्या या प्रसंगावधानामुळे तिचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

मित्रांनो, या ठिकाणी या प्रसंगाचा उहापोह करण्याचे हेच कारण आहे की, आपणाला शाळेतून, पाठ्यपुस्तकातून जे शिकवले जाते ते फक्त परीक्षेत मार्क्स मिळविण्यापुरते मर्यादित असू नये तर ते आपल्या व समाजाच्या उपयोगी पडावे आणि हे तेव्हाच साधेल जेव्हा आपण प्रत्येक विषयातील प्रत्येक गोष्ट आपल्या कायमची लक्षात राहील या दृष्टीने त्यांचा अभ्यास करु.



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा








मुलांनो! पॅराशूट एक वैज्ञानिक उपकरण आहे. त्याचा शोध ए.जे. गार्नेरिन यानं लावला.कळलं
हो! टीचर
टीचर! पॅराशूटचा आपल्याला काय उपयोग होतो? ते फुग्याप्रमाणे कोणाला गिफ्ट म्हणून सुध्दा देता येत नाही. त्याला उघडलं तर ते आपल्याबरोबर उडवून घेऊन जातं.
विमानातून प्रवास करणाऱ्यांसाठी उपयोगी येतं. संकटकाळी पॅराशूटच्या साहाय्याने प्रवासी सुखरुप जमिनीवर उतरु शकतो.
युध्दाच्यावेळी याच्या सहाय्याने सैनिक आपल्या छावणीवर उतरु शकतो.
टीचर पॅराशूटची छत्री कसली बनलेली असते.
पॅराशूटची छत्री रेशम किंवा नायलॉनची असते कारण रेशम व नायलॉन मजबूत आणि हलकं असल्यामुळे पॅराशूटला उडण्यास मदत होते.


टीचर, पॅराशूट गोलाकारच असते का ?
नाही किट्टी! ते आयताकार तसेच अंडाकृतीही असते. तसेच ते रंगीबेरंगीसुध्दा असते.
मुलांनो, पॅराशूटच्या आधारे उडणाऱ्या व्यक्तीला काय म्हणतात ?
माहित नाही टीचर, कृपया तुम्हीच सांगा.
पॅराशूटने उडणाऱ्या व्यक्तीला स्कायड्रायव्हर म्हणतात.
हो, टीचर


मुलांनो, आज पॅराशूटींचा एक असा खेळ बनला आहे, की ज्यामध्ये स्कायड्रायव्हर आकाशात खूप उंचावर जाऊन जमिनीवर झेप घेतात.
त्यांना भीती वाटत नाही का टीचर?
भीती कशाची? त्यांनी त्याचे पूर्ण प्रशिक्षण घेतलेले असते.
टीचर, आज तुम्ही पॅराशूटबद्दलची पूर्ण माहिती दिलीत त्याबद्दल धन्यवाद!





निहार कोतावडेकर



पृथ्वीराज दिंडे





स्वना जाधव



कनिका सुर्वे



हर्षित शिवणकर



# वाचन प्रेरणा दिवस

१६ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आहे. तो दिवस शासनाने वाचन प्रेरणा दिवस म्हणून घोषित केला आहे. तरी यानिमित्त सर्वांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी खालील माहिती अवश्य सांगावी.

१) महात्मा फुले हे मोठे क्रांतीकारक झाले याला कारणीभूत एकमेव गोष्ट म्हणजे थॉमस पेन यांनी लिहिलेले 'राईटस् ऑफ मॅन' नावाचे पुस्तक. या पुस्तकातून महात्मा फुले यांना प्रेरणा मिळाली.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतरत्न झाले. याचे मूळ हे केळुसकर गुरुजी यांनी बाबासाहेबांना लहानपणीच भेट दिलेले 'बुध्दचरित्र' हे पुस्तक आहे.

३) भगतसिंग यांना इंग्रजांनी फाशीची शिक्षा सुनावली, ज्यावेळी सकाळी फाशी देणार होते त्याच्या आदल्या रात्रीच भगतसिंग हे एक पुस्तक वाचत होते. ते पाहून तेथील जेलरने भगतसिंग यांना विचारले, तुला तर उद्या फाशी देण्यात येणार आहे; मग ह्या पुस्तक वाचण्याचा काही उपयोग होणार नाही!

त्यावेळी भगतसिंग जेलरला म्हणाले, की माझ्या वाचनातून अनेक भगतसिंग जन्माला येतील.

४) भगतसिंग यांनी तुरुंगात असताना पुस्तक वाचावयास मिळावे यासाठी अन्नत्याग करुन उपोषण केले होते.

५) वाचन हा शब्द कसा तयार झाला?
वचन चा अर्थ शपथ; शपथ चा अर्थ यशस्वी मार्ग. यावरुन वाचनाचा अर्थ हा शंभर टक्के यशस्वी मार्ग होय.

६) बाबासाहेबांनी पुस्तकासाठी राजगृह नावाचे एक घरच बांधले होते; त्यात हजारो पुस्तकं होती.

७) अब्राहम लिंकन हा तर पुस्तकवेडा माणूस होता. एकदा तर शेजाऱ्यांकडून घेतलेले पुस्तक पावसात भिजल्याने त्या पुस्तकाची मजुरी म्हणून पुस्तक देणाऱ्याकडे त्यांनी काम केले.

८) नेपोलियन बोनापार्ट ने वाचलेल्या पुस्तकांची यादी आजही पॅरिसमधील वस्तुसंग्रहालयात आहे.

९) म. गांधींच्या जीवनाला कलाटणी मिळाली ती जॉन रस्कीन या लेखकाच्या 'अनटू धीस लास्ट' या पुस्तकामुळे!





कथा

# हुशार राजू

राजू आठवी इयत्तेत शाळा शिकत होता. ज्या रस्त्याने राजू शाळेत जायचा त्या रस्त्यात एक भली मोठी शिळा पडलेली होती. शिळा खूपच मोठी असल्याने त्या रस्त्याने येण्या जाण्यास,रहदारीस अडथळा निर्माण होत होता. एवढी मोठी शिळा हटविण्यासाठी गावकऱ्यांनी खूप चर्चा करुन काही अनुभवी अभियंत्यांना पाचारण केले.

एक अभियंता म्हणाला, या शिळेचे तुकडे करावे लागतील आणि ते भरुन न्यावे लागतील. याकरिता जवळजवळ आठ हजार रुपये खर्च येईल.

दुसऱ्या अभियंताने सांगितले, शिळा वाहून नेण्यासाठी एक मोठी मजबूत अशी लोखंडी हातगाडी तयार करायची. तिच्यावर शिळा ढकलत ठेवायची आणि गावाबाहेर नेऊन टाकायची. यासाठी सहा हजार रुपये खर्च येण्याची शक्यता आहे.

त्याचवेळेस तिथे नुकतेच राजू आणि त्यांचे सवंगडी शाळेतून परतले होते. त्यांनी तेथील लोकांचे संभाषण ऐकले. त्यावर राजू म्हणाला, मी एका रात्रीत फक्त पाचशे रुपयात इथून ही शिळा नाहीशी करु शकतो.

तू ही शिळा एका रात्रीत कशी काय नाहीशी करणार ? राजूला विचारण्यात आले. तेव्हा राजू म्हणाला, हे सर्व उद्या समजेल.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व गावकरी तिथे जाऊन पाहतात तर शिळा नाहीशी झालेली दिसली. गावकऱ्यांनी त्यामागचे रहस्य राजूला विचारले. त्यावर राजू म्हणाला, मी आणि माझ्या मित्रांनी रात्री या शिळेजवळ खड्डा खणला. त्या खड्ड्यात ही शिळा ढकलून दिली. खोदलेली माती तिच्यावर पसरवली आणि त्यावर पूर्वी जसा होता तसा रस्ता बांधला.

रस्त्यातील अडचण दूर झाल्यामुळे गावकरी भलतेच खूश झाले. त्यांनी राजूच्या कार्याची प्रशंसा केली आणि राजू व त्याच्या मित्रांचा बक्षिस देऊन सत्कार केला.

❏❏❏

पान क्र. ३४ वरुन

अभ्यासाच्या योगाने ही वासना नाहीशी होते." असे म्हणून त्यांनी तेथे गंध उगाळलेले होते ते एका वस्त्रात घातले आणि राजांना पिळायला सांगितले. त्याप्रमाणे दोनतीनदा करविले. तेव्हा ते कोरडे झाले. नंतर समर्थ म्हणाले, "याप्रमाणेच वासनेचा क्षय होतो."

राजे म्हणाले, "अज्ञानामुळे अद्याप नीट कळले नाही." तेव्हा समर्थांनी सुंदर उपदेश केला. "जलयुक्त गंधापासून पाणी जसे वेगळे केले, तसा जो अनात्मा आहे, तो आत्म्यापासून वेगळा करावा. म्हणजे वासना नाहीशी होते." हा विषय त्यांनी राजांच्या मनात पूर्णपणे बिंबवून दिला. ते एकून शिवाजी महाराजांना तात्काळ उपरती झाली आणि ते म्हणाले, "ह्या जीवाला वासना अशी कोणतीच उरली नव्हती. फक्त एक ह्या तलवारीत राहिली होती, तीही आज श्रीचरणी अर्पण करतो." असे म्हणून महाराज रात्रंदिवस जी भवानी नावाची उत्तम तलवार बाळगीत ती त्यांनी समर्थांच्या पुढे ठेवली. नंतर समर्थांचा निरोप घेऊन शिवराय गडावर गेले ही भवानी तलवार त्या दिवसापासून समर्थ नेहमी उशाशी बाळगीत असत, असे म्हटले जाते.

❍ क्रमशः



जागतिक आश्चर्य

# स्टॅच्यु ऑफ लिबर्टी



अमेरिका म्हटलं की, आठवतो 'स्टॅच्यु ऑफ लिबर्टी' म्हणजेच स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा! अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात लिबर्टी या नावाच्या बारा एकर क्षेत्रफळाच्या बेटावर स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा आहे. हडसन नदीच्या मुखाशीच हा पुतळा असल्यामुळे अमेरिकेत येणाऱ्यांच्या स्वागतासाठीच ही देवता उभी असल्याचा भास होतो.

शिल्पकार फ्रेडरिक बार्थोल्डी यांनी हा पुतळा फ्रान्समध्ये घडविला. हा पुतळा तांब्याचा आहे. जुलै १८८४ मध्ये हा पुतळा तयार झाला. या पुतळ्याला आधाराची रचना गुस्ताव आयफेल (आयफेल टॉवरचे रचनाकार) यांनी केली. १७ जून १८८५ मध्ये तो फ्रान्सहून न्यूयॉर्क बंदरात आणला गेला. **२८ ऑक्टोबर १८८६** रोजी हा पुतळा राष्ट्राला समर्पित केला गेला.

या स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याची उंची (जमिनीपासून हातातील मशालीपर्यंत) ९३ मीटर म्हणजेच ३०५ फूट आहे. या देवतेच्या उजव्या हातात मशाल असून तिच्या साह्याने ती जग प्रकाशित करते आहे व तिच्या डाव्या हातात एक पत्रिका आहे. या पत्रिकेवर अमेरिकेच्या स्वातंत्र्य घोषणेच्या दिनाची तारीख म्हणजे ४ जुलै, १७७६ कोरलेली आहे. या स्वातंत्र्यदेवतेच्या मस्तकावरील मुकुटात सात आऱ्या आहेत. या सात आऱ्या सात समुद्र व युरोप खंडातील सात देश दर्शवितात.

हा स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा फ्रान्सने अमेरिकेस भेट दिला असल्यामुळे हा पुतळा त्या दोन राष्ट्रांच्या मैत्रीचे प्रतीक म्हणूनही ओळखला जातो. स्वातंत्र्यदेवतेच्या या पुतळ्याच्या पायामधील दुसऱ्या मजल्यावरील संग्रहालयात या पुतळ्याच्या इतिहासाची ओळख करुन दिलेली आहे. पूर्वीच्या बेदलोई, परंतु आताच्या लिबर्टी बेटावर हा पुतळा पाहण्यासाठी जगभरचे लोक येतात. १९८४ पासून हा पुतळा एक जागतिक आश्चर्य म्हणून ओळखला जातो.

❑❑❑



# अजब नगरी





अजब नगरीचा गजब राजा
तो करतो नवी रोजच मजा

प्रजेला म्हणे नाचा खूप खूप
बसू नका असे कोणीही गुपचूप




म्हणता छान गाणे गोड गाता गाता
खूप पेढे खा भरपूर आता

सारे पोटभर  मुद्दाम हसा
खुशीत असे रोज मला दिसा




गजब राजाची अजब बात
केले बघा त्याने  कायदे सात

होता त्यातला  एकच मोठा
प्रत्येकाने पैसा चालवावा खोटा






कविता : सदानंद बामणे

# सामान्य ज्ञान



१) नासाचे युजीन पार्कर हे यान अवकाशात कोणत्या ख-गोलाचा अभ्यास करण्यासाठी सोडण्यात आले ?

अ) शुक्राचा ब) सूर्याचा क) मंगळाचा ड) शनिचा

२) आमीर खान या सिनेकलाकाराने कार्यान्वित केलेली कोणती योजना महाराष्ट्राला वरदान ठरत आहे ?

अ)वृक्षारोपण ब)प्लास्टिक बंदी क)जलसंधारण ड) कृषी उत्पादन

३) मातृभाषेतून शिक्षण घ्यावे असा आग्रह धरणारे रेमन मॅगेसेसे पुरस्कार विजेते शिक्षणतज्ज्ञ कोण ?

अ) डॉ.सोनम वांगचुक ब) डॉ.भरत मोटवानी

क) डॉ.प्रकाश आमटे ड) डॉ.अभय बंग

४) आशियाई क्रीडा स्पर्धेत नेमबाजीत सुवर्णपदक मिळवणाऱ्या १६ वर्षीय खेळाडूचे नाव काय ?

अ) अनिश भानवाला ब) सौरभ चौधरी क) मीत जैन ड) संजीव राजपूत

५) चंद्रगुप्त मौर्याला सिंहासनावर बसवणारी व्यक्ती कोण ?

अ) धनानंद ब) अशोक क) सेल्युकस ड) चाणक्य

६) झाडाच्या कोणत्या भागात अन्न साठवले जात नाही ?

अ) खोड ब) फळ क) फुलाची पाकळी ड) मूळ

७) संत ज्ञानेश्वरांच्या बहिणीचे नाव काय ?

अ) मुक्ताबाई ब) जनाबाई क) बहिणाबाई ड) मीराबाई

८) पदार्थाच्या एकूण अवस्था किती ?

अ) एक ब) दोन क) तीन ड) चार

९) भारतीय 'साहित्य क्षेत्रातील' मोठा पुरस्कार कोणता ?

अ) साहित्य अकादमी ब) ज्ञानपीठ क) जनस्थान ड) नोबेल

१०) अमेरिकेत असलेला स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा अमेरिकेला कोणत्या देशाने भेट म्हणून दिला आहे ?

अ) फ्रान्स ब) रशिया क) इंग्लंड ड) जपान

उत्तरे इतरत्र



# कोकिळ





उन्हाळ्याची चाहूल लागली, की कुहू कुहू अशा मधुर आवाजात कोकिळ पक्षी साद घालतो. आशियामध्ये आढळणाऱ्या या पक्ष्याला इंग्रजीमध्ये एशियन कोयल असं म्हणतात. कोकिळ पक्षी भारतात सर्वत्र आढळतो. तसंच बांग्लादेश, पाकिस्तान, म्यानमार व श्रीलंका या देशांमध्येही याचे वास्तव्य दिसून येतं.

साधारणपणे कावळ्याच्या आकाराचा हा पक्षी १५ ते १८ इंच लांबीचा व १९०-३२७ ग्रॅम इतक्या वजनाचा असतो. नर व मादी कोकिळ पक्ष्यांमध्ये खूप फरक असतो. मादी आकाराने मोठी आणि सफेद ठिपके असलेली तर नर चमकदार निळसर झाक असलेला गडद काळ्या रंगाचा असतो. नर कोकिळ कुहू कुहू या आवाजात गातो तर मादी त्याला किक किक असा आवाज करत प्रतिसाद देते. दोघांचे डोळे गुंजासारखे लाल असतात. आपल्याकडे जो भारद्वाज पक्षी दिसतो तो पण या जातीमध्ये मोडतो. याच्या किमान तीन उपजाती आहेत.

कोकिळेची दोन खास वैशिष्टये म्हणजे हा पक्षी मधुर आवाजात गातो. यामुळेच खुद्द दीदी - लता मंगेशकर ह्यांना गानकोकीळा संबोधलं जातं आणि दुसरं वैशिष्ट्य म्हणजे हा पक्षी आपली अंडी इतर पक्ष्यांच्या म्हणजे अगदी कावेबाज कावळ्याच्या किंवा कलहप्रिय मैनेच्या घरट्यात चालते. याच्या पिल्लांचा रंग काळाच असतो त्यामुळे पिल्लू मोठं होऊन उडेपर्यंत कावळ्याला सुध्दा कळत नाही. मुख्य करुन किडे, अळ्या खाण्याकडे कोकिळेचा भर असतो. कधी कधी इतर पक्ष्यांची अंडी, गोगलगायी सुध्दा खातो.

कोकिळा एका वेळी ७-१० अंडी घालते. इतर पक्ष्यांची अंडी ढकलून त्यांच्या घरट्यातही अंडी घालते. ही अंडी १२-१४ दिवसांत उबवली जातात आणि त्यानंतर ही पिल्लं बाहेर येतात. ही पिल्लं २५-२८ दिवसात उडण्यास सक्षम होतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# अनुभव

फार पूर्वीच्या काळातील गोष्ट आहे. वैराटक नावाचे एक राज्य होते. राजा प्रेमसागर त्या राज्याचा राजा होता. राजा नावाप्रमाणेच प्रेमाचा सागर होता. तो आपल्या मंत्री महोदयांचा त्याचप्रमाणे रयतेचा चांगल्याप्रकारे सांभाळ करत असे. त्याच्या राजदरबारी प्रामाणिक नावाचा एक सेनापती होता. तो त्या राजाकडे नेहमी स्वत:चे राज्य असल्याप्रमाणे सेवा करायचा. राज्यातील जनतेच्या काही समस्या असल्या तर त्या राजाच्या कानावर घालून त्या समस्येतून राज्यातील लोकांना न्याय द्यायचा. त्यामुळे सारी जनतासुध्दा राजाचा आदर करायची.

काही वर्षे राजाकडे सेनापतीची सेवा केल्यानंतर प्रामाणिक नावाचे सेनापती वृध्द झाले.

राजाच्या मनात आले आता आपण यांना रिटायर करुन त्यांच्या जागी एखाद्या नवतरुणाची नेमणूक करावी. राजाने इतर मंत्र्यांचा सल्ला घेतला आणि अचानक एके दिवशी त्याने सेनापतीला सेनापतीच्या सेवेतून मुक्त केले. तेव्हापासून सेनापती प्रामाणिक आपल्या कुटुंबासोबत राहू लागला. जरी तो राजाकडे नव्हता तरीसुध्दा त्याला याची जाणीव होती की मी जरी आता सेनापती नसलो तरी मी या राज्याचे अविभाज्य अंग आहे. अर्थात मला माझ्या कर्तव्याला जागलेच पाहिजे. नावाप्रमाणेच तो प्रामाणिक होता.

ठरल्याप्रमाणे राजाने एका नवीन तरुणाची सेनापतीपदी नियुक्ती केली. काही दिवसातच त्या राज्यावर शेजारच्या राजाने चाल केली. राजाने आपल्या नवतरुण सेनापतीला सैन्य घेऊन लढाईवर पाठविले. नवतरुण सेनापती राजाज्ञा स्वीकारुन मोठ्या उत्साहाने सैन्य घेऊन शत्रूवर चाल करण्यासाठी गेला. परंतु ज्या ठिकाणी त्याने सैन्याचा तळ केला होता त्या ठिकाणी पाण्याची सोय नव्हती. आजूबाजूला कुठेच पाणी मिळवण्याचे साधन नव्हते. नवीन सेनापती मोठ्या चिंतेत पडला. आपल्याजवळ असलेले हत्ती, घोडे, गाढव तसेच अफाट सैन्यासाठी पाण्याची काय व्यवस्था करायची? या विचाराने तो हतबल झाला.

इतक्यात एका घोड्यावर बसून आपल्याच दिशेने येत असलेली एक वृध्द व्यक्ती त्याला दिसली. ती व्यक्ती जवळ आल्यानंतर त्याने आपली पाण्याची समस्या कथन केली. हे ऐकून ती वृध्द व्यक्ती म्हणाली, "तुमच्याकडे असलेले एक गाढव मोकळे सोडून द्या. ते गाढव ज्या ठिकाणी जमिनीचा वास घेईल त्याठिकाणी खोदकाम करा."

सेनापतीने तसे केल्यानंतर काही मिनिटातच त्यांना पाणी मिळाले. हे पाहून तो नवतरुण सेनापती म्हणाला आपण फारच महान आहात; आपण कोण आहात? आपलं नाव काय? राजाकडे शिफारस करुन मी आपणाला बक्षीस द्यायला लावतो. त्यावर ती व्यक्ती म्हणाली माझे नाव प्रामाणिक. मी पूर्वी राजाकडे सेनापती होतो.

हे ऐकताच नवीन सेनापतीला ओशाळल्यासारखे झाले. झाला वृत्तांत त्याने राजाला सांगितला. राजाला आपली चूक समजली. त्याने प्रामाणिकला पुन्हा बोलावून त्याचा सन्मान केला.

मित्रांनो, नेहमी वयोवृध्दांचा सल्ला घ्या. त्यांचा अनुभव तुम्हाला तुमच्या कार्यात मदत करील.



# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) क
३) अ
४) ब
५) ड
६) क
७) अ
८) क
९) ब
१०) अ

## शब्दकोडे १७१

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ ए | | २ सं | ज | ३ य | |
| ४ तु | क | डो | जी | | शो | |
| ती | | | ५ व | सुं | ध | ६ रा |
| | | ७ ध्व | नी | | ८ रा | जा |
| ९ कं | १० स | | | ११ झे | | रा |
| | ई | | १२ अ | ब्रा | १३ ह | म |
| | १४ बा | य | को | | जा | |
| १५ बा | ई | | १६ ला | हो | र | |

।। तू ही निरंकार ।।

# वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
# प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


॥ तुही निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
अंचित रा. पाटील
राकेश ज. पाटील
कुशल रा. पाटील